


१२ मे आंतर राष्ट्रीय परिचारिका दिन महाराष्ट्र स्टेट गव्हर्मेंट एम्प्लॉईज नर्सेस असोसियशन तर्फे झाला. याच दिवशी ससून हॉस्पिटल समोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण झाले.

शासकीय परिचारिकांच्या अनेक रास्त मागण्या लोकशाही मार्गाने व सहकार्याने सोडविण्याचा प्रयत्न वरील संघटना गेली १५ वर्षे सातत्याने करीत आहे. अनेक प्रश्न शासनाने योग्य तो प्रतिसाद देऊन सोडविलेही आहेत. सौ. अनुराधा आठवले संघटनेच्या नेत्या व पदाधिकारी यांची बदली अंबेजोगाई येथे केली. त्याचा हेतू या बदलीमागे अन्यायाविरुद्ध लढणारी ही संघटित प्रेरक शक्ती नष्ट करावी कमजोर करावी, हा स्पष्ट होत आहे. या उघड कामगार अनुचित प्रथा आहेत. या अन्यायाविरुद्ध असंतोषाची नोंद म्हणून १२ मे १९८१ हा फ्लोरन्स नाईटिंगेलचा जन्म दिवस तिला अभिवादन करून परिचारिकांच्यावर अन्याय केला म्हणून आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनादिवशी या संघटीत असंतोषाची नोंदशासनाकडे उपोषणाद्वारे केली. या उपोषणास ससून सर्वसाधारण हॉस्पिटल, पुणे चेस्ट हॉस्पीटल, औंध, मेंटल हॉस्पिटल, येरवडा, व कामगार विमा योजना हॉस्पिटल औंध यातील सभासदानी भाग घेतला.

✻

## स्त्री-मुक्ती झिंदाबाद—मुक्याला वाचा फुटली !

१६ एप्रिल १९८१. हाच तो दिवस या दिवशी आम्ही क्रांतिकारी महिला संघटनेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्याचे ठरविले. पहिले ठिकाण महादेवनगर व दुसरे सातववाडी. महादेवनगरमधील कार्यक्रमाला चार–सहा तरुणांनी बरेच सहकार्य केले. त्या दिवशी आम्ही सकाळपासूनच सायंकाळच्या कार्यक्रमाची तयारी करीत होतो. कार्यक्रम सायंकाळी ५ वाजता होता. स्त्रिया हा हा म्हणता दोन–अडीचशे जमल्या आणि आमच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली.

'ऑर्डर ... ऑर्डर ... ऑर्डर' म्हणत हातातील हातोडी आपटीत आमच्या जनता कोर्टाची सुरूवात झाली. सूत्रधार डॉ. नीलम गोऱ्हे व न्यायाधीश मीना इनामदार या होत्या. प्रथम कोर्टात अर्ज वाचण्यात आला. या अर्जात लता जाधव यांनी असे म्हटले होते की २३ मार्च रोजी घरमालक लवांडे यांनी मला स्वतःच्या घरात कोणी नसताना व माझे पती घरी नसतांना दारू पिऊन येऊन स्वयंपाक करण्याची जबरदस्ती केली असता मी नकार दिला व मी शेजारील चाळीत जाऊन बसले. नंतर मी सायंकाळी घरी गेले असता माझ्या कडेवरील मुल खाली टाकून त्याने मला हात ओढून आपल्या घरात नेऊन मारहाण केली व माझे कपडे फाडले. मी ओरडल्यामुळे आजूबाजूचे लोक जमा झाले. व त्याच्या पकडीतून मी पळत मुलाला घेतले व परत शेजारील चाळीतील श्रीमती पोकळे यांच्या घरी जाऊन बसले. नंतर पोलीस कंप्लेट केली पण त्यांनी त्याला त्या दिवशी पकडून नेले व सकाळी

सोडून दिले व त्यानंतर त्याने परत पोलीस माझे काय करणार आहेत. 'रिक्षात बस' अशी धमकी दिली. मला योग्य न्याय मिळावा म्हणून मी क्रांतिकारी महिला संघटनेकडे विनंती केली. त्यांनी मला मदत करण्याचे मान्य केले. पोलिसांकडून योग्य न्याय मिळणार नाही म्हणून आम्ही जनता कोर्टात त्याला शिक्षा देऊ असे सांगितले.

'जनता कोर्टात' लता जाधव व श्रीमती पोकळे व श्रीमती शितोळे यांच्या साक्षी झाल्या, अशा आरोपीस समाजात मान देऊ नये असे ठरले सामाजिक बहिष्काराची शिक्षा देण्यात आली. खरे पाहता ग्रामीण भागात स्त्रियांचे एवढे धाडस म्हणजे मुक्याला वाचाच फुटली.

नंतर मालिनीताई तुळपुळे, विद्या बाळ, आ. विठ्ठल तुपे व जयदेव गायकवाड यांची भाषणे झाली. त्यांनी आम्हाला मदतीचा हात पुढे केला आहे. अध्यक्ष पदावरून बोलतांना मालिनीताई तुळपुळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करून राखीव जागा असू द्याव्यात असे म्हटले. आ. तुपे यांनी या प्रकरणाची कसून तपासणी व्हावी असे पोलीस खात्यात सांगितले आहे.

नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस आ. विठ्ठल तुपे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आभार मानण्यात आले. आणि शेवटी क्रांतीकारी महिला संघटनेचा विजय असो अशा घोषणा देत कार्यक्रम संपला.

क्रांतीकारी महिला संघटनेचा विजय हा आपणा सर्व स्त्रियांचा विजय, प्रत्येक स्त्रिचा विजय आहे. त्यासाठी सर्व स्त्रियांनी प्रत्येक वेळेस अशीच साथ द्यावी.

'स्त्रीमुक्ती झिंदाबाद'

**श्रीमती नीलम पवार**
महादेवनगर

## बजाज टेंपो कामगारांना महिलांचा पाठिंबा

दि. १५ मार्चपासून बजाज टेंपो कामगारांचा बेमुदत संप सीटूच्या नेतृत्वाखाली सुरू झाला आहे. मालकाला नफा होऊनही मालक वेतन वाढ देण्याचे टाळत आहे. उत्पादन वाढीचा करार करा म्हणजे वेतनवाढ देतो असे मालकांचे म्हणणे आहे. वास्तविक सध्या उत्पादन कमी होते असे नाही. म्हणून कामगारांनी उत्पादन वाढीशी वेतन वाढीचे संबंध न लावता एकूण नफ्याशी लावून वेतनवाढ द्या या मागणीसाठी बेमुदत संप सुरू केला संप सुरू झाल्याबरोबर मॅनेजमेंटने कारखान्यातील रेशन दुकान बंद केले. त्याचप्रमाणे कामगार दहशत निर्माण करीत आहोत असा प्रचार करण्यास सुरुवात केली याचा निषेध करण्यासाठी, त्याचप्रमाणे कामगारान पाठिंबा देण्यासाठी ४०० महिलांनी भर दुपारी दोन वाजता उन्हातून आकुर्डीगावातून मोर्चा काढला टेंपोच्या गेटवर महिला मोर्चाचे स्वागत करण्यासाठी सुमारे दीड हजार कामगार जमले होते. तिथे महिलांनी कामगारांना पाठिंबादर्शक भाषणे दिली. व मालकाच्या अरेरावीपणाचा निषेध केला. या मोर्चात केवळ बजाज टेंपो कामगाराच्या गृहीणी नव्हत्या तर अन्य कारखान्यातील कामगारांच्या गृहीणीही सामील झाल्या होत्या.

—लता

## अन्यायाविरुद्ध लढचास सिद्ध व्हा–

८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिवस श्रमिक महिला संघातर्फे आकुर्डी येथे मोठ्या उत्साहान साजरा करण्यात आला. श्रमिक महिला संघातर्फे ८ मार्च निमित्ताने एक सभा आयोजित करण्यात आली होती त्याच्या प्रमुख पाहुण्या भारतातील प्रसिद्ध आदीवासी कार्यकर्त्या कॉ. गोदावरी परुळेकर होत्या. सभा आयोजित करण्यात कामगार गृहीणी व कामगार स्त्रियांचा पुढाकार मोठा होता. सभेचा प्रारंभ स्त्री-मुक्ती गीताने झाला. आपल्या सहज सोप्या भाषणात कॉ. गोदुताईनी स्त्रियांवरचे विविध अत्याचार सांगीतलेच पण त्याचबरोबर वेगवेगळ्या ठिकाणी स्त्रिया अत्याचाराविरुद्ध कशा संघटित होत आहे तेही सांगीतले. आदिवासी स्त्रियांनी दिलेल्या झुंजार लढ्याची माहिती दिली.

या सभेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कामगार गृहिणींनी सादर केलेली स्त्रियांच्या विविध प्रश्नांची नाटिका! ही नाटीका कॉ. कल्पना जवळेकर ह्यांनी लिहिली होती.

सभेला १००।१२५ स्त्रिया आपल्या मुलाबाळांसह आल्या होत्या.

—बायजा प्रतिनिधी

## आमची क्रांतिकारी संघटना

आत्तापर्यंत आम्ही सावंतवाडीत अनेक वेळा एकत्र आलो. अर्थात बारसे, हळदी-कुंकू, वटपुजा या निमित्ताने परंतु अशा घाईघाईत आम्ही एकमेकींना हळदी कुंकू पानसुपारी देऊन पाठवणी केली. परंतु गेले कित्येक दिवस आम्ही डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या मार्गदर्शनाखाली एकत्र येत आहोत. संघटित होण्याचा प्रयत्न करीत आहोत.

सुरुवातीला कुतुहलापोटी आम्ही दोघीच महिला पुण्यात परिषदेला गेलो होतो. संघटनेची सुरुवात इतक्या अल्प संख्येने झाली. परंतु तेथील महिलांचो गर्दी पाहून कुपमंडूक आहोत की काय? असे वाटू लागले. क्षणभर वाटले चार बायकात बसून चकाटच्या पिटण्यापेक्षा अनेक महिलांच्या समस्या जाहिरपणेसमाजापुढे मांडाव्यात. त्या सोडविण्याचा प्रयत्न करावा. म्हणून संघटनेला एकीची गरज असते. यासाठी आम्ही घरोघर फिरलो. परंतु आपण जर संघटनेत जाऊ तर शेजारी-पाजारी मूर्खात काढतील, नावे ठेवतील या वृत्तीच्या महिलांनी आम्हाला प्रथम प्रतिसाद दिलाच नाही. अशा तऱ्हेने आमची संघटना प्रथम मूळच धरेना. त्यामुळे आमचा उत्साह कमी होऊ लागला. परंतु आम्ही चिकाटी सोडली नाही आमच्या प्रयत्नांना अपयशातून यशाचे किरण दिलासा देऊ लागले.

आम्ही स्त्रियांच्या आरोग्यविषयक, हुंडाविषयक, तसेच बाळसंगोपन या विषयावर एक प्रदर्शन आयोजित केले. काही बोधप्रद अशी समुह गीतेही बसविली. या कार्यक्रमालाही आपल्याला अपयश मिळेल की काय अशी भिती वाटत होती. परंतु काय आश्चर्य आमचे हे प्रदर्शन पहायला सावंतवाडीमध्ये सुमारे १०० महिला आल्या. व त्यांनी आम्हाला काही ना काही आर्थिक मदत केली. तसेच दुसऱ्या दिवशीही सुमारे ७० ते ७५ महिला येऊन प्रदर्शन पाहून गेल्या अशा तऱ्हेने सातववाडीतील प्रदर्शन यशस्वी झाले.

तसेच महादेवनगर येथेही संघटनेच्या काही हौसी कार्यकर्त्यांनी प्रदर्शन आयोजित केले होते. तेथेही महिलांनी मोलाचा प्रतिसाद दिला. सुमारे १५० महिलांनी प्रदर्शन पाहिले. नंतर आम्ही ७ मार्च १९८१ या दिनानिमित्त एक मेळावा आयोजित केला होता. आमच्या संघटनेचे सर्व सभासद व निमंत्रक या मेळाव्याला हजर राहून पडेल ते काम उत्साहाने व आनंदाने करत होते. मेळाव्याचे उद्दिष्ट असे की; एरव्ही आपण रोजच्या चाकोरीतून वेगळे काही करू शकत नाही. शिवाय सुधारणा (स्त्रियांची) हे केवळ पुरुषाचे काम नाही.

स्त्रिया शिकल्या सवरल्या म्हणजे सुधारणा झाली असेही नाही. स्त्री सुधारणा म्हणजे तिच्या आचाराविचारात होणारा बदल आणि या सुधारणेला, परिवर्तनाला बौद्धिक अधिष्ठान लाभले तर आजच्या स्त्रीचेएक वेगळेच अभिमानास्पद रूप आपल्याला दिसेल. अशा तऱ्हेने प्रबोधन म्हणजेच जागृती हे संघटनेचे उद्दिष्ट आहे. तसेच गरजू महीलांना रोजगार उपलब्ध करूनही देण्याचा प्रयत्न आणि वेळ पडल्यास संघर्षही करणे ही आमच्या संघटनेची प्रमुख कर्तव्ये होत. या मेळाव्यासाठी औरंगाबादवरून श्री. सुभाष लोमटे हे आपला अमूल्य वेळ खर्चून आले होते.

तसेच 'स्त्री' मासिकाच्या संपादिका 'विद्याताई बाळ' यांनीही साध्या सोप्या भाषेतून जणूकाही गप्पाच मारतोय अशा भाषेतून भारतीय स्त्रिच्या परंपरेची उकल समजावून दिली.

नंतर समर नखाते यांनी 'स्ट्रीट प्ले (रस्तानाटच) दाखवून 'स्त्री' ही वस्तू नव्हे पैशाने विकत घेतलेला गुलाम नव्हे. तर तिला स्वतःचे असे काहीतरी अस्तित्व आहे. माणूस म्हणून जगण्याचा तिलाही अधिकार आहे अशा तऱ्हेने स्त्रिच्या वास्तव जीवनाची भूमिका अत्यंत मार्मिकतेने दर्शविली. मेळाव्याला १०० ते १२५ महिला हजर होत्या. 'वसुधा सरदार' यांनी ग्रामीण भाषेतील सुलभ चालीची गाणी आपल्या कर्णमधुर आवाजातून गायिली व आलेल्या स्त्रियांनी मोठचा हौसेने त्यांना प्रतिसाद दिला. आणि कार्यक्रमाला अधिकच रंगत आली. अशा तऱ्हेने विविध क्षेत्रातील व्यक्तींनी आम्हाला प्रतिसाद दिला व आमचा मेळावा यशस्वी झाला.

**सुशीला देशमुख**
सातववाडी